# आचार्य द्रोण

अनंत तिबिले

रिया पब्लिकेशन्स्

**आचार्य द्रोण : अनंत तिबिले**

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ३८०/-

# आचार्य द्रोण

# एक

गंगाद्वारीवरच्या एका आश्रमातील लहान कुटीत पर्णशय्येवर ती पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी तडफडत होती. कुशीमागून कुशी बदलत होती. ओटीपोटातून निघणाऱ्या असह्य वेणांनी कासावीस झाली होती. तिच्या सुंदर मुखकमलावर असंख्य घर्मबिंदू गोळा झाले होते. तिची नाजूक-कोमल तनुलता चिंब भिजली होती. पुष्ट छातीवरील कंचुकी आणखीन आणखीनच घट्ट भासू लागली होती. कमरेखालचं मुलायम वस्त्रही भिजलं होतं. तिने आपले पातळ लालचुटुक अधर आपल्या कुंदकळ्यासम दंतपंक्तीखाली गच्च दाबून धरून कंठातून बाहेर पडू पाणारं विव्हळणं महत्प्रयासानं आवरून धरलं होतं. कण्हणं टाळलं होतं. पण तडफड – ती मात्र तिला आवरता-सावरता येत नव्हती. तिला त्या कुटीमधील सगळी जमीन पुरेनाशी झाली होती.

तिचं वय सांगता येणं कठीण होतं. मात्र तिच्या नाजूक कोमलांगावर बहरलेलं-फुललेलं यौवन नवयुवतीलाही शरमेने मान खाली घालावयास लावण्याइतपत समर्थ होतं. तिची नितळ कांती, गौरांग तिच्या सौंदर्यात भरच घालीत होतं. नाजूक, किंचित उंच शरीरबांधा, धाकटी कमर, पुष्ट नितंबभाग आणि मांसल-पुष्ट यौवनभार तिच्या तारुण्याची साक्ष देत होते. तिच्या उंचीला साजेसाच तिचा चेहरा उभट होता. आणि उभट चेहऱ्याला शोभण्यासारखीच तिची नासिका धारदार नि तीक्ष्ण होती. त्या मानाने अधर भलतेच नाजूक नि लालबुंद होते. भरीव गालावरची गुलाबी जणू तिने गुलाबपुष्पाकडूनच चोरलेली होती. किंचित मोठ्या डोळ्यांत सागराची अथांगता होती. मात्र त्यावरच्या काळ्याभोर, रेखीव भिवया धनुष्यासम होत्या. तिचा काळाभोर विपुल केशसंभार तिच्या मुखावर मुक्तपणे विहरत होता. त्यामुळे तिच्या सुंदर मुखकमलाचे दर्शन दुर्लभ बनत होते. एखाद्या कृष्णमेघाआड निमिषमात्र दडणाऱ्या नि मग दृग्गोचर होणाऱ्या चंद्रबिंबासारखेच वाटत होते ते. एरव्ही तिचं सौंदर्य नि यौवनभार कुणालाही

मोहात पाडणारा होता खचित. पण आज मात्र तो विकल बनला होता... असाहाय्य झाला होता. अगतिक बनून तडफडत होता.

त्या इवल्याशा पर्णकुटीत ती एकटीच होती. बाहेर माणसं वावरत होती. वावरणाऱ्या माणसांचा पदरव, हलक्या आवाजातलं कुजबुजणं, धीरगंभीर आवाजातला मंत्रोच्चार तिच्या कानांवर अगदी स्पष्टपणे येत होता. मधूनच एखाद्या आश्रमवाशी युवतीचं मोहक आवाजातलं हसणं कानावर पडत होतं. मंद वायुलहरींबरोबर येणारा सुगंध तिच्या पातळ नाकपुड्यांत शिरून तिच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित करण्याचा प्रयत्नही करीत होता. पण आज या साऱ्यानं हर्षभरीत होण्यासारखी तिची अवस्थाच नव्हती. ओटीपोटातून निघणाऱ्या असह्य वेणा थेट तिच्या मस्तकापर्यंत जाऊन पोहोचत होत्या. त्यामुळे दोन्ही नाजूक हातांनी आपली कमर दाबून धरत होती आणि अंथरलेल्या पर्णशय्येवर असहायपणाने गडबडा लोळत होती...

आणि तशाही अवस्थेत स्वत:ला विचारत होती, 'मातृत्व हवं होतं ना तुला?'

'स्त्री म्हणून जन्माला आलेल्या जिवाला मातृत्व हवंच असतं. अगदी कीडमुंगीपासून सर्वांना. मातृत्वाविना स्त्रीजन्माचं सार्थकच होत नाही मुळी...'

'होय ना, मग आणखीन काही वेळातच तुला हवं ते मातृत्व तुला लाभणार आहे. तुझं आपलं मूल जन्माला येणार आहे. तू आई होणार आहेस. अशा अवस्थेत आपल्या मुलाच्या स्वागतासाठी तू तर उभं राहायला हवेस...'

'हो!... खरं आहे ते. पण या वेणा माझ्या कोमलांगाला सहनच होत नाहीत. त्यांनी या शरीराला असहाय बनविलं आहे. आणि म्हणूनच तर मीही अशी अगतिक होऊन तडफडते आहे...'

'म्हणजे मातृत्व सहजासहजी प्राप्त होत नाही तर...'

'नसावं बहुतेक!... माझ्यावरचा हा पहिलाच प्रसंग असल्याने मला या खडतर, असह्य अनुभवाची कल्पना नाही. पण ज्याअर्थी माझ्या वाट्याला हे आले आहे त्याअर्थी मातृत्व लाभलेल्या प्रत्येक स्त्रीला या दिव्यातून जावेच लागत असावे...'

'पण हे एवढं मोठं दिव्य करून, मातृत्व लाभून काय साधणार आहेस तू ?'

'केवळ मातृत्त्वच!... दुसरं काहीच नाही...'

ओटीपोटातून निघालेली एक वेणा थेट तिच्या मस्तकापर्यंत पोहोचली नि तिची विचारशृंखला तुटली. ती अगदी पहिल्यांदाच का होईना केवढ्यांदा तरी विव्हळली आणि बाहेर कुणाची तरी पावलं वाजली... कुणीतरी पर्णकुटीतही शिरले. पर्णकुटीत



प्रवेश करणारी तिच्याचसारखी एक नवयौवना होती. समोरच्या युवतीची ती असहाय अवस्था पाहून ती तिच्या दिशेने धावली आणि तिला सावरण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, 'घृता काय झालं गं? तू अशी तडफडते आहेस का?'

'मातृत्व हवं होतं ना मला? त्यासाठीच तर ही तडफड आहे...'

'म्हणजे, मातृत्व हे एवढं कष्टप्रद...'

'आज अनुभवते आहे म्हणूनच कळते आहे. सखी, तुला याची कल्पना यायची नाही. कारण तो मोह निदान आजपावेतो तरी तुला झाला नाही... पण मी...'

'तूही या मोहात गुंतायला नको होतंस घृता!'

'वेडे, माणूस स्वत: गुंततच नाही मुळी. मोहच त्याला आपल्या करपाशात जखडून टाकतो. माझंही काहीसं असंच झालं. मी कुठंतरी अडकते आहे... गुंतते आहे याची त्याक्षणी मला जाणीवच झाली नाही...'

बोलत असतानाच घृताचे नयनकमल तिला नकळतच मिटले गेले. नि कमलदलात अडकून पडणाऱ्या भ्रमरावत गतस्मृती तिला आपल्या अस्तित्वाची याद करून देऊ लागल्या.

गंगातीर... गंगामाईच्या पृष्ठभागावर अवखळपणा करणाऱ्या लहरी एकामागोमाग एक किनाऱ्यावर येऊन आपटत होत्या. फेसाळ लाटांच्या आपटण्याने उडालेले जलकण टपोऱ्या मोत्यांगत सूर्यकिरणांत चमचम करीत होते. मंद वारा अंगाला गुदगुल्या करीत होता आणि घृता एकापाठोपाठ एक येणाऱ्या लाटांकडे एकटक पाहात गंगातीरी बसून होती. तिचं आजूबाजूला कुठंच लक्ष नव्हतं.

गंगेच्या त्या फेसाळ लाटा आपल्याला जणू बोलावत आहेत, आपल्याशी जवळीक करण्यासाठी, आपल्या कोमलांगाचा सुखद स्पर्श अनुभविण्यासाठी उत्सुक बनल्या आहेत असं तिला वाटू लागलं. तिलाही गंगामैय्याचा तो थंडगार शीलत स्पर्श हवाहवासा वाटू लागला. तिला तीरावर बसून राहणं पसंतच पडेना. जावं आणि यौवनभारानं बहरलेला हा देह थंड करावा असं तिला राहून राहून वाटू लागलं. खळखळणाऱ्या जललहरी तिला साद घालीतच होत्या. गंगामाई तिला आपल्याकडे बोलावत होती. तिचं कोमलांग आपल्या बाहूत घ्यायला जणू अधीर बनली होती.

ती भारावल्यासारखी उठली. आपण एकवस्त्रा आहोत याचंही भान उरलं नाही तिला. ती मंत्रमुग्धासारखी चालू लागली... प्रथम जललहरी तिच्या नाजूक पदकमलांना

स्पर्श करीत राहिल्या... नंतर त्यांनी तिच्या रेखीव नाजूक पोटऱ्यांशी अवखळ चाळा केला. संधी पावताच त्या गुडघ्यापर्यंत वर सरकल्या... मग गोऱ्यापान केळीच्या मोन्यागत मांड्या... कमर.... उरोभाग... नाजूक मान...

थंडगार जललहरींचा सुखद स्पर्श सर्वांगाला होताच, तिच्या अंगावर गोड शिरशिरी उठली. कुणीतरी आपल्या सर्वांगावरून मोरपीस फिरवत असल्याचा भास तिला झाला. तिचा यौवनभार शहारला... सर्वांगावर सरसरून काटा उभा राहिला...

काही वेळ जललहरींशी अवखळ चाळा केल्यानंतर आणि आपलं सर्वांग गारठलं आहे याची जाणीव होताच ती पाण्याबाहेर आली....

तिच्या अंगावरचं मुलायम, पातळ वस्त्र तिच्या मांड्यांना चिकटून बसलं होतं. अवखळ वाऱ्याच्या झोताने भिजलेला पदर खाली घसरलेला होता. कंचुकी उरोभागाला घट्ट बिलगल्यामुळे तिच्या पुष्ट उरोभागाची गोलाई तिच्याकडे पाहणाऱ्याच्या चटकन नजरेत भरत होती. काळाभोर कुंतलभारही चिंब झाला होता आणि त्यातून ओघळणारे जलबिंदू तिच्या गुलाबी गालांवरून टपोऱ्या मोत्यांगत खाली घरंगळत होते. ती त्या तशा अवस्थेत पुन्हा एकटक किनाऱ्याशी अवखळ चाळा करणाऱ्या जललहरीकडे पाहात होती...

'सुंदरऽऽऽ अति सुंदर...' अचानक मागून शब्द आले आणि ती केवढ्यांदा तरी दचकली... गर्रकन वळली आणि आपल्या मागे एक कृश शरीराचा पण तेजस्वी मुद्रेचा पुरुष उभा आहे असं पाहताच खरंच लाजली. तिने चपळाईने आपला घसरलेला पदर सावरला... खालच्या मानेने उभी राहून ती आपल्या पायाच्या नखाने खालच्या वाळूशी चाळा करीत राहिली.

'मी हे स्वप्न तर पाहात नाही ना?' तो पुरुष उद्‌गारला. पुढे म्हणाला, 'कमलपुष्पाचं सौंदर्य पाहिलं आहे मी. प्रात:काली संध्यासमयी अवकाशाच्या पोकळीला जो सप्तरंगाचा सुरेख मुलामा चढतो त्यावरही मोहित झालो आहे मी. प्रात:कालच्या नानाविध पक्ष्यांच्या कलरवानेही चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या आहेत माझ्या. जललहरींची ही खळखळ, अवखळ झऱ्याचं गीत, धीर-गंभीर स्वरात उच्चारल्या जाणाऱ्या मंत्रोच्चारातल्या पावित्र्यानेही मला भारावून सोडलं आहे. पण मानवी सौंदर्य... यौवनभाराचं हे सुरेखपण, ही सुवर्णकांती, सुंदर अधरावरचं मोहक हास्य, चित्तवृत्ती उत्तेजित करणाऱ्या मुद्रेवरच्या या भावभावना; या मात्र मी आज अगदी प्रथमच पाहतो आहे. ब्रह्माने आपल्या कुशल हाताने एवढी अप्रतिम, सुंदर नि देखणी प्रतिमा बनविली



असेल आणि त्यामुळे हा तपोनिष्ठ भरद्वाज आपलं सर्वस्व विसरून बसेल असं मला याआधी कुणी जरी सांगितलं असतं तर मी त्याला वेड्यातच काढलं असतं. त्याच्या भविष्यवाणीवर कदापि विश्वास ठेवला नसता. पण आज जे अवलोकिलं त्याने मी माझं सर्वस्वच हरवून बसलो आहे. माझं अस्तित्व केव्हाच संपलं आहे. आपल्या दर्शनाने मी खरंच तृप्त झालो आहे. देवी, कृपा करून आपण आपलं नाव सांगाल तर मी खरंच धन्य होईन...'

घृताने किंचित मान वर करून आपल्या तिरप्या नजरेनं त्याला न्याहाळून घेतले.

त्याचंही क्षीण-अस्थिपंजर शरीर ओलं होतं. अंगावरचं वस्त्र चिंब भिजलं होतं. हनुवटीवरची दाढी, मस्तकावरचा केशसंभार निथळत होता. त्याचं शरीर क्षीण होतं; मात्र त्याच्या चेहऱ्यावरील तेज कुणालाही चकित करणारं होतं. त्याचा विशाल कपाळभाग त्याच्या बुद्धिमत्तेची साक्ष देत होता. शिवाय त्याच्या डोळ्यातलं तेज कुणाच्याही अंत:करणाचा ठाव घेणारं होतं...

प्रथमदर्शनीच ती त्या मुनिवरावर मनोमन भाळली. अस्फुट स्वरात उत्तरली, 'मुनिवर, दासीला घृता या नावाने ओळखतात. आपल्या बोलण्यावरून आपण ख्यातनाम मुनिवर भरद्वाज आहात हे मी ओळखले आहे. प्रणाम मुनिवर...'

'देवी, प्रणामाची भाषा करून मला लाजवू नकोस. मी वेदशास्त्रसंपन्न आहे हे मला मान्यच आहे. अस्त्रविद्येतही या भरद्वाजाचा हात धरणारा अन्य कुणी नाही याचीही जाणीव मला आहे. पण तरीही आज मी तुझ्या नयनबाणांनी पूर्णत: विद्ध झालो आहे. तुझा हा यौवनभार, हे असामान्य लावण्य याने माझा केव्हाच पराभव केला आहे. आणि पराजिताने कधीच प्रणाम स्वीकारायचा नसतो; उलट त्यानेच प्रणाम करावयाचा असतो. देवी, हा ऋषिराज भरद्वाज खरंच आज तुला शरण आला आहे.'

'मुनिवर दासीला लाजवत आहेत. उगाचच दासीची स्तुती करीत आहेत. मी खरेच या योग्यतेची नाही...'

'स्वत:पाशीच असलेल्या कस्तुरीचा शोध घेणाऱ्या मृगागत तुझी अवस्था आहे देवी. आपल्यापाशी काय आणि केवढं जबरदस्त सामर्थ्य आहे याचाच विसर पडला आहे तुला. तुझ्यापाशी नेमकं काय आहे हे पाहायचंच असेल तर कृपा करून माझ्या डोळ्यात पाहा. आपलं सामर्थ्य खचितच तुझ्या नजरेत भरेल.'

घृता लाजली. मात्र स्त्रीसुलभ स्वभावाप्रमाणे स्वत:च्या स्तुतीने भारावली... मोहरलीसुद्धा. आपल्या समोर उभी असलेली व्यक्ती सामान्य नाही याची तिला खात्री

होती. भरद्वाजांचं नाव तिने अनेकांच्या तोंडी अनेक वेळा ऐकलं होतं. भरद्वाज ज्ञानी होते. नश्वर शरीराकडे लक्ष देण्यापेक्षा शाश्वत तपोबल साध्य करणं म्हणजेच पुरुषार्थ गाजविणं होय असं त्यांचं प्रामाणिकपणाचं मत होतं. त्यामुळेच त्यांनी स्वत:च्या शरीराकडे पूर्णत: दुर्लक्ष केलं होतं. अंती मातीच असलेल्या शरीराचं त्यांनी कधीच मोल केलं नव्हतं. त्यामुळेच दिवसानुदिवस आपलं शरीर क्षीण होत चाललं आहे याचं त्यांना कधीच वैषम्य वाटलं नव्हतं. तपोबल वाढविण्यासाठी त्यांनी आपल्या शरीराला असंख्य बंधनं घालून घेतली होती. त्यामुळेच शास्त्राध्ययनात तर ते निपुण झालेच होते; पण त्याचबरोबर केवळ त्यावरच संतुष्ट न होता त्यांनी शस्त्रविद्येचाही अभ्यास केला होता. त्यामुळेच की काय त्यांना अप्राप्य असं आग्नेय अस्त्र प्राप्त झालं होतं; मात्र त्यांनी हे अस्त्र स्वत:जवळच ठेवलं नव्हतं. गुरू या नात्यानं आणि उदार मनानं त्यांनी ते अग्निवेश ऋषीला अर्पण केलं होतं. ज्ञानाचा संचय करण्याची वृत्ती तशी वाईटच. ज्ञानदानाने ज्ञान संपत नसून ते वाढतच जाते आणि ज्याने ज्ञान प्राप्त केले त्याने ते वाटतच राहायला हवे. त्याचं ते परम पवित्र कर्तव्यच असते याची खात्री असल्यामुळेच त्यांनी ज्ञानदानाचे कार्यही आरंभिले होते. आणि म्हणूनच भरद्वाजांची कीर्ती दिगंतरास जाऊन पोहोचली होती. अन्य ऋषिमुनींच्या मनात त्यांच्याबद्दल आदरभाव निर्माण झालेला होता. त्यांना मान होता. सन्मानानेच त्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात येत होता.

घृताने हे सारे ऐकले होते. आणि या क्षणी तेच भरद्वाज आपल्यासमोर उभे असल्याचे पाहून ती मनोमन हरखली होती. तिची सर्व काया मोहरली होती. एक अनामिक; पण हवीहवीशी वाटणारी हुरहूर तिच्या मनाला लागून राहिली होती. रविकिरणस्पर्शानं कलिका फुलते तद्वतच केवळ भरद्वाज ऋषींच्या दर्शनानेच तिच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित बनल्या होत्या....

कळत नकळतच ती स्वत:ला पुसू लागली होती, 'घृता, तोल जातो आहे तुझा.'

'ही समोर उभ्या असलेल्या मुनिवरांचीच किमया...'

'पण तुझ्यासारख्या स्त्रीने हा असा आपला तोल जाऊ देता नये...'

'असं म्हणणं म्हणजे रविकरस्पर्शाने कमलिनीने फुलता नये असा होतो...'

'तुझ्या मनात आहे तरी काय?'

'परमेश्वरासमोर उभं राहिल्यानंतर भक्ताच्या मनात जे असतं तेच...'

'भक्त तर आपलं सर्वस्व परमेश्वरचरणी वाहतो...'



'संधी मिळालीच तर मीही तेच करीन...'

'पण ती चूक ठरेल...'

'त्याचबरोबर एका मुनिश्रेष्ठाची मन:कामना पुरी केल्याचं समाधान...'

'हे समाधान तुला जगू द्यायचं नाही...'

'मी मृत्यूची केव्हाच तयारी केली आहे!... मात्र तत्पूर्वी हा देह या ऋषिश्रेष्ठाच्या समाधानार्थ लागावा...'

'पण त्याचा क्षीण देह, अस्थिपंजर अवस्था याचं तुला काहीच का वाटत नाही?'

'मुनिवराचं सामर्थ्य त्याच्या तपोबलानं मोजलं जातं. त्याचं योगसामर्थ्य, युद्धनिपुणता आदी गोष्टींचा विचार केला जातो. शरीर तसं पाहिलं तर मिथ्यामातीचं. अल्पायुष्य त्याचं, मात्र सिद्धी अक्षय. मुनीवरांनी ही सिद्धीच प्राप्त केली आहे म्हणूनच जनमानसात त्यांच्याबद्दल आदरभाव आहे. त्यांचं नाव लोक मोठ्या सन्मानाने घेतात. त्यांना गुरुतुल्य समजतात...'

'घृता, एका ठराविक भावनेच्या अधीन झाली आहेस तू. म्हणूनच तर या मार्गातले धोके तुला कळेनासे झाले आहेत. तू वास्तवता विसरली आहेस. घृता, आपण नेमक्या कोण आहोत याचे स्मरण कर. हे मर्त्यलोक तुझ्या दृष्टीने निरुपयोगी आहे. त्याचा नि तुझा तसा काही एक संबंध नाही. या मर्त्यलोकात गुंतशील तर तुझं अधिकाराचं स्थान गमावून बसशील...'

'देवीऽऽऽ' अगदी जवळून हाक आली आणि घृताची तंद्री भंगली. ती भानावर आली. तिने चमकून आवाजाच्या दिशेनं पाहिले. तो मुनिवर तिच्या अगदी जवळ आला होता... त्याच्या नजरेतील सिद्धीचं तेज आता कुठल्याकुठे नाहीसं झालं होतं. त्याची जागा कामुकतेने घेतली होती. त्याचा श्वास तिच्या गालांना स्पर्श करीत होता. आणि त्यातील उष्णता तिथूनही तिला जाणवत होती....

तिचं सर्वांग एका विशिष्ट जाणिवेने थरारलं. गोड रोमांच उभे राहिले तिच्या सर्वांगावर. गात्र नि गात्र पुलकित झाले तिचे. तिला नकळतच तिची नाजूक काया गरम झाली. शरीरातलं रक्त तापलं. श्वासोच्छ्वास जोरजोरात सुरू झाला तिचा. त्यामुळे तिचा चिंब भिजलेला उन्नत उरोभाग विलक्षण वेगाने वरखाली होऊ लागला. भरद्वाजांच्या नजरेला नजर देण्याचं साहस तिला झालं नाही. आपल्या धडधडणाऱ्या छातीला दोन्ही हातांचा आधार देत नजर जमिनीवर रोवून ती ओठातल्या ओठात पुटपुटली, 'देवी नाही ऋषिराज, दासी...'

'जिने या भरद्वाजाचं मन जिंकलं आहे ती दासी असूच शकत नाही...'

'पण मुनिवरांनी देवी संबोधावं इतपत ही घृता थोरही नाही...'

'तू कोण आहेस, तुझी योग्यता कोणती याच्याशी मला काहीच कर्तव्य नाही. मी फक्त तुझं हे शरीर जाणतो. तुझ्या या सौंदर्याचे मोल करतो. तुझ्या या यौवनभारात आपलं अस्तित्व बुडवून टाकण्याची इच्छा करतो. मात्र हे सारं तुझ्या खुशीने व्हावं असंच मला वाटतं.'

'मुनिवर, दासीला इच्छा नसते. हवं नको म्हणण्याचा अधिकारही नसतो. जललहरीत वाहून जाणाऱ्या एखाद्या क्षुल्लकशा पर्णासारखी तिची गत असते. मीही त्याच योग्यतेची. पण आज मात्र मला माझ्या इच्छेची कदर करण्याचा, हवं तेच स्वीकारण्याचा अधिकार लाभलेला आहे. आणि मुनिवर, हे आपणच मला देऊन माझा गौरव केला आहात. आता माझ्यापाशी जे काही आहे ते सारं आपलंच आहे. आपण ते स्वीकारू शकता किंवा फेकूनही...'

'नाही देवी, नुकतंच उमललेलं फूल फेकून देणं म्हणजे त्याच्या सौंदर्याचा नि गंधाचा अवमान करण्यासारखं आहे. कुणीही रसिक हे अघोरी कर्म करणार नाही. माझ्याकडूनही हे होणे नाही...'

आणि भरद्वाज पुढे सरकले... त्यांच्या क्षीण बाहूंचा विळखा घृताच्या कमनीय देहाभोवती पडला. एरव्ही कमलदलात भ्रमर अडकतो; पण आज भ्रमरपाशात कमलच जखडले गेले. घृताची काया मोहरली. त्या सुखद स्पर्शाने बहरली. तिचं अंगोपांग रोमांचित झालं. तिचा श्वासोच्छ्वास वाढला. मात्र विलक्षण वेगाने वरखाली होणारा उरोभाग भरद्धाजाच्या क्षीण छातीवर दाबला गेल्याने त्याला काहीशी निश्चिंती मिळाली. त्याचवेळी भरद्वाजांच्या ओठांनी तिच्या नाजूक कोमल अधरद्वयींना अंकित केले.

घृता भारावल्यासारखी चालली होती... भरद्वाजांच्या मागून. स्वत:चं अस्तित्व विसरून. स्वत्त्व हरवून... मंत्रमुग्धासारखी. त्यांच्याशिवाय तिला दुसरे काहीच दिसत नव्हते. एखाद्या कुशल धनुर्धाऱ्याला जसं आपलं लक्ष्यच दिसत असते, दबा धरून बसलेला शिकारी जसा आपल्या सावजावरच नजर रोवून राहतो अगदी तद्वतच तिची गत झाली होती. तिचं सर्वस्वच मुळी भरद्वाज बनले होते. शरीराच्या अणूअणू भागात मिसळले होते. त्यांनी तिचं स्वत्त्वच हिरावून घेतले होते.

त्यांच्या मागून ती एखाद्या आज्ञाधारकासारखी चालली होती....



रम्य परिसर. नानाविध वृक्षांच्या छायेखाली लहान लहान पर्णकुटिका अंतर राखून उभ्या होत्या. कुमार वयातील मुलांची इकडून तिकडे ये-जा सुरू होती. संध्यासमय, वरचं नीलांबर नानाविध रंगात रंगलेलं होतं. दाटीवाटीनं विहार करणाऱ्या शुभ्र मेघांच्या कडा सोनेरी दिसत होत्या. थव्याथव्यानं संचार करणारा पक्षीगण, इकडून तिकडे निश्चिंतपणानं झेपा घेत धावणारे मृगांचे कळप आणि गर्द वनराजीतून 'सू' असा मधुर स्वर करीत धावणाऱ्या वायूलहरी... सारं वातावरणच कसं विलोभनीय नि मोहात टाकणारं होतं. शिवाय जागोजागी जे ताटवे होते त्यावर फुललेल्या फुलांचा सुगंधही मन प्रसन्न करीत होता...

पण यातील कशाकडेच त्या दोघांचंही लक्ष नव्हतं. ते दोघेही एका वेगळ्याच भावनेने भारावलेले होते. एका वेगळ्याच सुखाच्या प्राप्तीसाठी अधीर बनले होते. त्या अनामिक; पण हव्याहव्याशा वाटणाऱ्या सुखाच्या कल्पनेनेच भारावलेले होते... आणि पुढेपुढेच चालले होते.

अखेर एका पर्णकुटीसमोर भरद्वाजांची पावलं अडखळली. त्यांनी पुढे होऊन पर्णकुटीचा दरवाजा उघडला. ते आत शिरले... पाठोपाठ घृताही होतीच. तिने पर्णकुटीत प्रवेश केल्याचे पाहताच स्वत: भरद्वाजांनीच स्वहस्ते दरवाजा बंद केला...

दरवाजा बंद झाला आणि घृतालाच धीर धरवला नाही. सागरमीलनाच्या ओढीनं बेभान होऊन धावणाऱ्या सरितेवत ती धावली... भरद्वाजांच्या कृश भासणाऱ्या बाहूंत विसावली आणि मग भरद्वाजही आपले स्वत्व विसरले...

कमलदलात आता मात्र भ्रमर बंदिस्त झाला....

'घृताऽऽऽ' भरद्वाजांची हाक.

'अं?'

'हा अन्याय तर नाही ना?'

'हा असला अन्याय स्त्री इतक्या शांतपणानं कदापि सहन करीत नाही. अशा वेळी ती चवताळलेली नागीण बनते... जागृत झालेल्या ज्वालामुखीसारखी भडकते... मुनिवर, या क्षणी घृताचं अंग पेटलं आहे खचित; पण ते केवळ तृप्तीच्या हव्यासानं... मुनिवरांनी आता विलंब करू नये. दासीचा देह शांत करावा... तिची तृष्णा भागवावी...'

आणि घृता भरद्वाजाला अधिकच बिलगली. तिच्या बाहूंच्या विळख्यातील ताकतही वाढली. शिवाय तिच्या ओठांनाही धरबंध उरला नाही.

दिवसांमागून दिवस जात होते. पण त्या दोघांना तृप्तीचे समाधान प्राप्तच होत नव्हते. तो क्षण गेला की, केवळ काहीच वेळ शरीराला शिथिलता येत होती. काहीसं थकल्यासारखं... दमल्यासारखं वाटत होतं त्यांना. पण मग पुन्हा त्याच क्षणाची आस लागून राहात होती, मनाला नि शरीरालाही. पुन्हा गात्र नि गात्र आतूर बनत होते. घृता वेड्यासारखी भरद्वाजांच्या प्रतीक्षेत राहात होती. आणि मग ते आले असं पाहताच स्वर्ग हाती गवसल्याचा, हात चंद्रापर्यंत पोहोचल्याचा भास होत होता तिला...

त्या दिवशी असेच झाले. तो क्षण पार पडला आणि का कुणास ठाऊक भरद्वाज गंभीर झाले. तिच्या विपुल केशसंभारातून सवयीने तितक्याच मृदूपणानं हात फिरवित म्हणाले, 'घृताऽऽऽ'

'अं?'

'आता हे थांबायला हवं असं नाही तुला वाटत?'

'आपलं मन काय सांगते आहे?'

'ते कर्तव्याची आठवण करून देते आहे. घृता, नाहीतरी गेले काही दिवस मी कर्तव्याला वंचित झालो आहे खरा. गुरुपद ग्रहण करूनही ज्ञानदान करणंच विसरून गेलो आहे. आश्रमातला सारा शिष्यगण माझ्या या अनपेक्षित वागण्याने चिंतातूर झाला आहे. पण मी तरी काय करू? माझं कशातच लक्ष लागेनासं झालं आहे. मन शरीराला आवरू पाहते आहे; पण निदान आज तरी शरीर मनाला मानायला, त्याचं काही ऐकायला तयारच होत नाहीय. मला चिंता वाटते ती याचीच. शरीराधीन होणारा माणूस माणूसच राहात नाही... माझ्या वाट्याला नेमकं हेच येणार नाही ना?'

'मुनिवर, आपली शंका रास्त आहे. शिवाय भयही योग्यच आहे. आपण भूलोकातील एक आदर्श पुरुष आहात. आज आपल्यावर अनेक कुमारांचं भवितव्य अवलंबून आहे. आपण हे असेच वासनेत बुडून राहाल तर समाजाच्या उपहासाचं निमित्त बनाल. हे श्रेष्ठ, आपण आजपावेतो जे नाही केलंत त्याबद्दल कुणीच काही बोलणार नाही. मात्र आज जे करता आहात ते वावगं असेल तर त्याला दूषण लावायला, आपलं चारित्र्यहनन करायला कुणीही मागेपुढे पाहणार नाही. घृता आपलीच आहे मुनिवर. घृतेनेही आपल्याशिवाय अन्य कोणत्याच पुरुषाला कधी आपले मानलेले नाही! आपण निश्चिंत असा. प्रथम आपल्या कर्तव्याचा विचार करा आणि वेळ सापडलीच नि इच्छा झालीच तर या दासीकडे जरूर या. दासी आपल्या सेवेला सदैव तयार असेल...'



'हे तू सांगते आहेस घृता?'

'हो!... मनावर कर्तव्याचा दगड ठेवून... मुनिवर, कर्तव्याच्या जोखडात नाहीतरी प्रत्येकजण अडकलेला असतो. मग मी तरी त्याला कशी अपवाद असेन. आपल्याला वेदाध्ययन, ज्ञानदान याची चिंता आहे आणि मी आपल्याबद्दलच्या कर्तव्यात जखडून गेले आहे. कोणतीही स्त्री आपल्या पुरुषाच्या पुरुषार्थाच्या आड कधीच येत नाही. त्याच्या पराक्रमाला आपल्या प्रेमरज्जूत कदापि जखडून टाकत नाही. उलट स्त्री पुरुषाच्या जीवनमार्गाला एक उदात्त तेजस्वी असं वळण देणारं साधन असतं. स्त्रीचं हे कर्तव्यच असतं. जी स्त्री पुरुषाच्या पुरुषार्थाला धार चढेल, त्याचा पराक्रम दिगंतरास पोहोचेल यासाठी प्रयत्न करीत नाही. ती स्वत:तर स्वत:च्या कर्तव्याला वंचित होतेच; शिवाय आपल्या पुरुषाच्या जीवनाचंही मातेरं करते. मुनीवर, मला हे पातक माझ्या माथी घ्यायचं नाही. मला माझ्या कर्तव्यापासून दूर व्हायचं नाही आणि आपलाही मार्ग अडवायचा नाही. आपण खरंच यापुढं माझी चिंता करू नका. गेले कित्येक दिवस केवळ वासनांध बनून मी जी तुमच्या ध्येयमार्गातील धोंड बनून राहिले होते. त्या माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा करा... एवढंच नव्हे तर घृता नावाची कुणी स्त्री आपल्या जीवनात कधी काळी आली होती याचीही स्वत:ला आठवण होऊ देऊ नका. मुनिवर, आजपावेतो आपण या दासीला जे काही दिलं आहात त्याचं मोजमाप करणं, मोल करणं निदान मला तरी शक्य नाही. मी तृप्त झाले आहे ती केवळ आपल्यामुळं, आपले हे ऋण मी कदापि विसरणार नाही...'

घृता बोलत होती, मनापासून बोलत होती, अगदी भाववश होऊन बोलत होती आणि त्याचवेळी तिचं शरीर तिला नकळतच भरद्वाजांच्या शरीराशी जवळीक साधू लागले होते. तिचा नाजूक करपाश केव्हाच त्यांच्या शरीराभोवती पडला होता... अंग अंगाला भिडले होते... आणि मग नीरव शांतता पसरली होती... वेगाने किनाऱ्याच्या दिशेने दौडत आलेली लहर तेवढ्याच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक वेगानं गंगामैय्याच्या पोटात गडप होऊन गेली होती....

भरद्वाजांचं येणं त्यानंतर अनियमित बनलं होतं. त्या पर्णकुटीत ती एकटीच राहात होती. पोटात भुकेचा डोंब उसळला की मग मात्र पर्णकुटीबाहेर पडून सभोवतालच्या घनदाट वृक्षराजीत फळं शोधीत होती. फळं खावीत, तहान लागलीच तर गंगामाईच्या पात्रातलं निर्मळ जल प्राशन करावं, कधी आश्रमातील मयुराशी वार्तालाप करावा, कधी एखाद्या मृगाला हळुवारपणानं कुरवाळावं, गंगामाईच्या तीरावर बसून नि पाय

पाण्यात सोडून गंगामाईच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या लहरींशी अवखळ चाळा करावा तर कधी उगाचच संध्यासमयी आकाशात भरून राहिलेल्या रंगछटा मोजण्याचा प्रयत्न करावा...

घृतेचे दिवस यातच चालले होते आणि त्याचवेळी तिला आपल्यात होत असलेला फरक जाणवू लागला होता... काहीतरी घडतंय; पण नेमकं काय घडतंय हेच तिला कळेना. मात्र जे घडतंय ते हवंहवंसं आहे, मनाला मोहविणारं, शरीराला एक नवा बहर चढविणारं आहे याबद्दल मात्र तिची खात्रीच होऊन चुकली होती. तशाही अवस्थेत ती स्वत:ला पुसत होती, 'आपली शरीरकांती पूर्वीपेक्षा अधिक नितळ दिसू लागली आहे. त्याचं कारण तरी काय असावं? आपलं शरीरही भरलं आहे, उरावरची कंचुकी दाटते आहे, ओटीपोटात एक वेगळीच हालचाल जाणवते आहे हे सारं काय आहे? हा परिणाम तरी कशाचा आहे? शिवाय यौवनाला आलेली ही उभारी, शरीरावर आलेला हा रसरशीतपणा, हालचालीतला मंदपणा हे सारे कशामुळे झाले असावे...?'

एखाद दिवशी ती काहीशी अस्वस्थ व्हायची. बेचैनी काही अंशी वाढायची तिची. सर्वांग घामानं भिजून जायचं. मुखकमलावरही घर्मबिंदू दाटी करायचे. काहीसं घाबरल्यासारखं व्हायचं तिला. तोंडात मळमळ सुरू व्हायची. आणि मग उलटी... कोरडीच; पण आतडी पिळवटून टाकणारी...

कधी कधी तर तिला हालचाल नकोशी व्हायची. सारी काया जडावल्यासारखी वाटायची. पर्णकुटीबाहेर न पडता नुसतंच पडून राहावं असं तिला वाटायचं आणि मग ती जमिनीवरील तृणशय्येवर निपचित पडून राहायची. कोणत्याही प्रकारची हालचाल न करता. अगदी निपचित. काही खावं-प्यावं, कुठंतरी हिंडावं, नेहमीसारखंच मयुराशी हितगूज करावं, मृगाला कुरवाळावं असं तिला वाटायचं देखील नाही. अगदी सर्व बाबींची शिसारी आल्यासारखं वाटायचं...

कधी तिला काही तरी आंबट स्वादाचं खावं असं वाटायचं. कधी गोड स्वाद चाखावा असं वाटायचं. कधी कधी तर तिला कंदमुळंच गोड लागायची.

ती याप्रमाणंच खायची-प्यायची; पण हे सारं कशामुळे घडते आहे याचा मात्र तिला काही केल्या अंदाजच बांधता यायचा नाही...

एक दिवस प्रात:कालीच कोवळ्या रविकिरणांचा सुखद स्पर्श चाखत ती गंगा किनाऱ्यावरील वाळूत पहुडली होती. अगदी निपचित....



'सखीऽऽऽ' तिच्या कानावर हाक आली होती. तिने आवाजाच्या दिशेने पाहिले होते. एक काहीशी प्रौढ दिसणारी स्त्री तिच्या अगदी जवळ उभी राहून तिलाच हाक मारत होती...

तिचं नाव घृताला ठाऊक नव्हतं. मात्र आश्रमात तिने तिला पाहिलं होतं. कुणा ऋषीची ती भार्या होती असं कुणीतरी सांगितलं होतं तिला...

'बोल प्रिये...'

'घृताच नाव ना तुझं?'

'हो!'

'तू सुदैवी आहेस. गेल्या दहा वर्षांत मी जे साध्य करू शकलेले नाही ते तुला पावलं आहे...'

'सखी, तुला काय म्हणायचं आहे...?'

'लवकरच तुला मातृत्व लाभणार आहे...'

'कायऽऽऽ'

'एवढं ओरडायला काय झालं तुला? वास्तविक मातृत्व म्हणजे स्त्रीचं पूर्णत्व! ते प्राप्त होणार केवळ या कल्पनेनेच ती सुखावते, आनंदातिशयाने वेडी होते. आणि तू! तू मात्र ही अशी किंचाळते आहेस. का ते सांग ना...'

'प्रिये, मी अविवाहिता. आणि अविवाहितेला मातृत्व हे परमेश्वराचं वरदान नसून शाप आहे हे काही मी सांगायला नको तुला...'

'वेडी आहेस घृता तू!... तसं पाहिलं तर मानवी जीवनात जे काही घडतं त्याचा कर्ताकरविता विश्वविधाताच असतो. माणूस फक्त निमित्त असतो. कुमारी अवस्थेत तुला जे मातृत्व प्राप्त होत आहे त्यामागे नियतीचाही काही हेतू असावा. शिवाय भरद्वाज ऋषी कुणी सामान्य पुरुष नव्हे वेडे!... तपोबल, ज्ञानसाधना, सिद्धी नि ज्ञानार्जन या बाबतीत कीर्तीशिखरावर आरुढ झालेल्या या मुनिश्रेष्ठाचा संग म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचा संग. त्याला हीन मानू नकोस. पातक ही संज्ञाही देऊ नकोस. माझी कूस निपुत्रिक असली तरी माझी नजर अनुभवी आहे. तुझी ही काया, तुझ्या नयनद्वयीतले भाव, तुझी आवडनिवड या साऱ्यांवरून तू लवकरच पुत्रवती होणार आहेस याबद्दल मला तिळमात्र संदेह नाही. घृते, आता या नव्या जिवाच्या स्वागताच्या तयारीला लाग. कधी काळी मुनिवर इथं आलेच तर त्यांनाही ही आनंदवार्ता सांग. तेही तृप्त होतील वेडे... खरंच तृप्त होतील...'

तिच्या या सहानुभूतीपर शब्दांनी तिला धीर आला. तिचं भय कमी झालं. नेमकं काय घडलं आहे नि काय घडणार आहे याच्या कल्पनेनेच तिचं गात्र नि गात्र पुलकित झाले. तिचे अंग नि अंग मोहरले. ही सुखद वार्ता मुनिवरांच्या कानावर कधी एकदा घालीन असं होऊन गेले तिला... ती भरद्वाजांच्या प्रतीक्षेत पर्णकुटीतच बसून राहू लागली... अगदी अधीर मनाने...

आणि मुनिवर आलेही... नेहमीच्याच संथ गतीने... गंभीर मुद्रेने... वृक्षाला बिलगणाऱ्या लतिकेप्रमाणे तीही बिलगलीच त्यांना. आपला नाजूक करपाश त्यांच्या गळ्यात अडकवित ती वेड्यासारखी एकटक न्याहाळातच राहिली त्यांना...

'घृताऽऽऽ' मुनिवरांची हाक.

'अं?'

'आज अगदी वेगळंच अनुभवतो आहे मी तुझ्या स्पर्शात...'

'मुनिश्रेष्ठींना जाणवलं ते?'

'स्पर्शातला फरक जाणवण्याइतपत सवय झाली आहे आता मला...'

'मग हा फरक आपणच ओळखावा...'

'घृता, वेदाध्ययनातल्या समस्या, युद्धकौशल्यातल्या खाचाखोचा, धर्मशास्त्रातलं बारीकपण आम्हाला तेव्हाच कळतं. फारसा विचारही करावा लागत नाही आम्हाला याबाबत. पण स्त्रीच्या वागण्यातला फरक, तिच्या हालचालीतल्या बदलात लपलेल्या समस्या आम्हाला अनभिज्ञच आहेत. आजपावेतो आम्ही जो स्पर्श अनुभवला तो एका प्रेयसीचा होता हे आता आम्हाला अनुभवाने कळून चुकलं आहे; पण हा स्पर्श... घृता, नाही ओळखत आम्हाला.'

घृता लाजली. निमिषमात्रच भरद्वाजांच्या उघड्या छातीवर आपले मस्तक घुसळीत राहिली आणि मग स्वत:शीच पुटपुटल्यासारखी म्हणाली, 'परमेश्वरानं मुनिवरांच्या सहवासाचा प्रसाद दिला आहे आम्हाला.'

'प्रसाद?'

'हो!... हा प्रसादच. आणि प्रसाद नेहमीच मंगल नि पवित्र असतो...'

'घृता, मला कळलं नाही तुझं बोलणं...'

'त्यासाठी मुनिवरांना स्त्रीजन्म घ्यावा लागेल. काया-वाचे-मने करून आपल्याचसारख्या थोर पुरुषाचा संग पत्करावा लागेल. तेव्हाच कुठं हे रहस्य उलगडेल...'

'घृता, आता अंत पाहू नकोस माझा. जे काही घडलंय ते अगदी स्पष्ट सांग...'



'मुनिवर, या घृतेला मातृत्व लाभणार आहे...'

'कायऽऽऽ'

'होय मुनिश्रेष्ठ, हे सत्य आहे. लवकरच ही घृता माता होणार आहे...'

'म्हणजे नकळतच मलाही पितृत्व...'

'ते ओघाओघानं आलंच मुनिवर...'

'पण हे सारं खरं ना घृता?'

'मुनिवर, घृता असत्य वचन कसं करेल ! तेही आपल्या परमेश्वरासमोर. हे खरं आहे ऋषिश्रेष्ठ. घृता माता होणार आहे... तीही आपल्याच मुलाची...'

भरद्वाज गंभीर झाले. घृतेपासून दूर झाले. पर्णकुटीच्या खिडकीपाशी येऊन उभे राहिले... मात्र बोलले काहीच नाहीत...

घृता घाबरली. तिचा सारा उत्साह मावळला. तिचं सर्वांग विचित्रसं कंप पावू लागलं. घशाला कोरड पडली तिच्या. नयनद्वयीत आसवंही गोळा झाली. ती भरद्वाजांच्या मागे जाऊन उभी राहिली आणि थरथरत्या आवाजात तिने हाक मारली, 'नाथऽऽऽ'

भरद्वाज गर्रकन वळले. काहीशा आश्चर्याने म्हणाले, 'घृता, स्त्री नाथ कुणाला म्हणते ठाऊक आहे तुला?'

'परवापर्यंत ठाऊक नव्हतं ते. पण आपल्याला मातृत्व लाभणार याची जाणीव झाली नि यापुढे आपल्याला नाथ याच नावाने हाक मारण्याचा निश्चय केला मी. मुनिवर आजचा हा स्पर्श प्रेयसीचा नव्हताच मुळी. तो होता तृप्त भार्येचा...'

'भार्या!' भरद्वाज उद्‌गारले. पुढं म्हणाले, 'विवाह सोहळ्याशिवाय, देवाब्राह्मणांना साक्षी ठेवून आणाशपथा घेतल्याशिवाय कुणीही पती होत नाही आणि कुणालाही भार्या बनता येत नाही हा भारतीय समाजरचनेचा नियम आहे घृता... यातलं काय केलं आहे आपण? केवळ योगायोगानं आणि तेही शारीरिक आकर्षणानं एकत्र आलो आपण. त्याच वेळी वासना स्वार झाल्या आपल्या शरीरावर. मनाचा विचार करण्याइतपत अवसरही सापडला नाही आपल्याला. साहजिकच शरीर वरचढ बनले आणि त्याने वासनांध बनून मनाची शिकारच केली...'

'याचा अर्थ मुनिवर आपलं पितृत्व नाकारत आहेत, माझ्या मातृत्वाला पाप समजत आहेत असं समजायचं का मी?'